# अपंग वित्त व विकास महामंडळ

## १. सीआर/५४९/जळगांव/२०१४

फिर्यादी हे जळगांव येथे रहाण्यास असून ते अंध आहेत. फिर्यादी यांना अपंग वित्त व विकास महामंडळाकडून रु. १ लाख कर्ज मंजूर झाले होते. सदर कर्ज मंजूर रक्कमेचा धनादेश फिर्यादी यांना देण्याकरीता आरोपी लोकसेवक वासुदेव आप्पा सातपुते, जिल्हा व्यवस्थापक, महारा ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, वर्ग—२, जळगांव हयाने रु.५०००/— लाचेची मागणी केली व दिनांक २५/०६/२०१४ रोजी पंचासमक्ष फिर्यादीकडून नमूद लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत जळगाव, जिल्हापेठ पोलीस ठाणे जळगांव, गुरनं. ३०२८/२०१४ कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) लाप्रका अन्वये गुन्हा नोंद करण्यात येऊन आरोपी लोकसेवक वासुदेव आप्पा सातपुते, जिल्हा व्यवस्थापक, महारा ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जळगांव याला अटक करण्यात आली आहे.